गाव तिथे प्रतिनिधी
नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक १०६ वा ● शनिवार ०२ सप्टेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 106 | Date : 02 /09/2023 | blow : Saturday | Page 4 | Price 4

# एक देश एक निवडणुकीसाठी केंद्राची समिती स्थापन

## माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद असतील अध्यक्ष; छत्तीसगडचे डीसीएम सिंहदेव यांनी केले समर्थन

नवी दिल्ली : केंद्र सरकारने एक देश एक निवडणूक यासाठी समिती स्थापन केली आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना त्याचे अध्यक्ष बनवण्यात आले आहे. त्याची अधिसूचना आज जारी होऊ शकते.

केंद्र सरकारने १८ सप्टेंबर ते २२ सप्टेंबरदरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. एक देश, एक निवडणूक यावरही सरकार विधेयक आणण्याची शक्यता आहे.



केंद्राने स्थापन केलेली समिती वन नेशन वन इलेक्शनच्या कायदेशीर बाबी पाहणार आहे. शिवाय यासाठी सर्वसामान्यांचे मतही घेतले जाणार आहे. दरम्यान, भाजप अध्यक्ष जेपी नड्डा कोविंद यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी पोहोचले. मात्र, या भेटीचे कारण समोर आलेले नाही. येथे लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे खासदार अधीर रंजन चौधरी म्हणाले की, सरकारला अचानक एक देश एक निवडणुकीची गरज का पडली?

दुसरीकडे, काँग्रेस नेते आणि छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री टीएस सिंहदेव म्हणाले - वैयक्तिकरीत्या मी एक देश एक निवडणुकीचे स्वागत करतो. ही नवीन कल्पना नाही, जुनी कल्पना आहे.

संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी ३१ ऑगस्ट रोजी ट्विट करून विशेष अधिवेशनाची माहिती दिली होती.संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी ३१ ऑगस्ट रोजी ट्विट करून विशेष अधिवेशनाची माहिती दिली होती.

अधिवेशनाच्या पाच बैठका असतील, जुन्या संसद भवनात सुरू होऊन नव्या भवना संपू शकते संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये सांगितले की, १८ ते २२ सप्टेंबरदरम्यान दोन्ही सभागृहांचे विशेष अधिवेशन होणार आहे. १७ व्या लोकसभेचे हे १३ वे आणि राज्यसभेचे २६१ वे अधिवेशन असेल. यामध्ये ५ बैठका होणार आहेत. अधिवेशन बोलवण्यामागे । पान २ वर

## उद्या होणार पावसाचे पुनरागमन

मुंबई : येणाऱ्या काही काळात देशातील विविध राज्यामध्ये पुन्हा एकदा जोरदार पाऊस बघायला मिळणार आहे. उद्यापासून म्हणजेच २ सप्टेंबरपासून पूर्व आणि पूर्व मध्य भारतातील राज्यांमध्ये मुसळधार पाऊस सुरू होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. याशिवाय केरळ, अंदमान आणि निकोबार बेटांवर पुढील पाच दिवस मुसळधार ते अतिवृष्टी होईल. आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये ३ ते ५ सप्टेंबर दरम्यान मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाच्या म्हणण्यानुसार, १ सप्टेंबर ते ३ सप्टेंबर दरम्यान ईशान्य भारत, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये मुसळधार पाऊस बघायला मिळेल. पूर्वी भारताबद्दल बोलले आणि अंदमान आणि निकोबारमध्ये पुढील पाच दिवस पाऊस पडेल. याशिवाय पश्चिम बंगालमध्ये ३ सप्टेंबरला आणि ओडिशामध्ये २ ते ३ सप्टेंबरदरम्यान मुसळधार पाऊस होईल. मध्य भारताबाबत हवामान खात्याने विदर्भ आणि छत्तीसगडमध्ये ३ ते ५ सप्टेंबरपर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. याशिवाय दक्षिण भारतामध्ये तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल आणि कर्नाटकात १ आणि २ सप्टेंबर रोजी मुसळधार पाऊस पडेल. याशिवाय उत्तर कर्नाटकात ३ आणि ४ सप्टेंबर, पश्चिम केरळमध्ये १ ते ५ सप्टेंबर आणि कोस्टल आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये ३ ते ५ सप्टेंबरला मुसळधार पाऊस पडेल.

हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार येत्या आठवडाभरात दिल्लीत पावसाची शक्यता नाही. १ सप्टेंबर रोजी दिल्लीचे कमाल तापमान ३७ अंश सेल्सिअस राहील, तर २ सप्टेंबर रोजी ते ३८ अंशांवर पोहोचेल. शनिवार आणि रविवारी दिल्लीतही जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. ४ सप्टेंबर रोजी किमान तापमान २६ अंश सेल्सिअस तर कमाल तापमान ३७ अंश सेल्सिअस राहण्याचा अंदाज आहे. येत्या आठवडाभर दिल्लीत तेजस्वी सूर्यप्रकाश राहील.

## केंद्र सरकारचा दुहेरी दिलासा; घरगुती सिलेंडर पाठोपाठ व्यावसायिक सिलेंडरच्या किमतीतही कपात



नवी दिल्ली : एलपीजी सिलेंडरच्या किमतींमध्ये केंद्र सरकारनं दुहेरी दिलासा दिला आहे. तीन दिवसांपूर्वी सरकारनं घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतींमध्ये २०० रुपयांची कपात केली होती. अशातच आज केंद्र सरकारनं व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किमतीतही कपात केली आहे. एलपीजी सिलेंडरचे नवे दर आजपासून लागू करण्यात आले आहेत. आजपासून म्हणजेच १ सप्टेंबर २०२३ पासून व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किमतींत मोठी कपात करण्यात आली आहे. १९ किलोग्रॅम व्यावसायिक गॅस सिलेंडरची किंमत १५८ रुपयांनी कमी झाली आहे.

तेल कंपन्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आता डझ्रञ् ग्राहकांना नवी दिल्लीत १९ किलोच्या व्यावसायिक डझ्रञ् गॅस सिलेंडरसाठी १,५२२ रुपये मोजावे लागणार आहेत. कोलकात्यात १९ किलो एलपीजी सिलेंडरची किंमत १६३६ रुपये, मुंबईत व्यावसायिक गॅस सिलेंडरची किंमत १४८२ रुपये आणि चेन्नईमध्ये १९ किलो एलपीजी गॅस सिलेंडरची किंमत १६९५ रुपये झाली आहे. देशभरातील महिलांना मोदी सरकारनं । पान २ वर

## इंडिया आघाडीचं ठरलं! लोकसभेला ४०० जागांवर एकास एक लढत देण्याची रणनिती?



मुंबई : मुंबईत आज विरोधकांनी स्थापन केलेल्या इंडिया आघाडीची तिसरी दोन दिवसीय बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाच्या मुद्दांवर चर्चा झाली. तसेच अनेक समित्या देखील स्थापन करण्यात आल्या आहेत. या बैठकीत आगामी लोकसभा निवडणूक लढविण्यासह ओबीसी जनगणनेबाबत सुतोवाच करण्यात आले.

'इंडिया' आघाडीच्या बैठकीत काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी ओबीसी जनगणना व्हायला हवी, याबाबत इच्छा व्यक्त केली. याबाबत २ ऑक्टोबरला चौथी बैठक दिल्लीला होण्याची शक्यता आहे. यावेळी एकाच व्यक्तीला संयोजक न करता संयुक्त लढाई लढण्याच्या प्रस्तावाबाबतही निर्णय दिल्लीला होणार असल्याचं सांगण्यात येत आहे.

दरम्यान केरळ आणि पश्चिम बंगाल वगळता समन्वय समिती नेमण्यात अडचण नसल्याचं समजतं. शिवाय ईव्हीएमविरोधात ओरड करणे अयोग्य असल्याची चर्चाही बैठकीत झाली. तसेच । पान २ वर

## जालन्यात मराठा आंदोलकांवर पोलिसांचा लाठीचार्ज, संतप्त आंदोलकांनी १२ बसेस जाळल्या

जालना : जालन्यातील लाठीचार्जनंतर मराठा समाज आक्रमक झाला आहे. संतप्त आंदोलकांनी १२ बसेस पेटवून दिल्या आहेत. एकट्या शहागड बस स्थानकात ६ बसेस पेटवून देण्यात आल्या आहेत. जालनातल्या लाठीचार्जचे पडसाद आता राज्यभरात उमटत आहेत. पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जनंतर संभाजीनगर बीड बायपासवर रास्ता रोको करण्यात आला. राज्य सरकारच्या निषेधार्थ घोषणाबाजीही करण्यात आली.

जालन्यात मराठा आंदोलकांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ उद्या बीड बंदची हाक देण्यात आलीय. मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले.



जालन्यातला लाठीचार्जचा प्रकार दुर्दैवी आहे, तो संयमानं घ्यायला हवा होता, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी म्हटलंय. मुख्यमंत्र्यांनी झी २४ तासशी फोनवरुन संवाद साधला. सरकार मराठा आरक्षणाच्या बाजूनं आहे. सगळ्यांनी शांतता राखावी, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी झी २४ तास वरुन केले आहे.

जालन्यामध्ये मराठा आंदोलनादरम्यान झालेल्या दगडफेकीत १२ पोलीस कर्मचारी जखमी झालेत. गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ही माहिती दिलीय. या पोलीस कर्मचा-यांवर उपचार सुरू आहेत. । पान २ वर

## राज्य शिक्षक पुरस्कारांची घोषणा; १०८ शिक्षक मानकरी

पुणे : शालेय शिक्षण विभागातर्फे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले. त्यानुसार राज्यातील विविध विभागांतील १०८ शिक्षक पुरस्काराचे मानकरी ठरले असून, शिक्षक दिनी (५ सप्टेंबर) पुरस्कार प्रदान कार्यक्रम मुंबईत होणार आहे. शिक्षक पुरस्कारांची घोषणा शिक्षण विभागाने शासन निर्णयाद्वारे शुक्रवारी केली. शिक्षण क्षेत्रात निष्ठेने काम करणाऱ्या शिक्षकांचा गौरव पुरस्काराच्या रुपात १९६२-६३पासून करण्यात येतो. या पुरस्कारांसाठी राज्य समितीची बैठक २५ ऑगस्टला झाली. त्यानंतर विभागनिहाय निवडयादी शिक्षण विभागाला सादर करण्यात आली. त्यानुसार प्राथमिक विभागात ३७, माध्यमिक विभागात ३९, आदिवासी क्षेत्रातील उत्कृष्ट कामासाठी १९, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कारासाठी ८, विशेष कला-क्रीडा विभागात दोन, अपंग विद्यार्थ्यांच्या शाळेतील शिक्षक विभागात एक, स्काऊट गाईड विभागात दोन असे एकूण १०८ शिक्षक पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

## आमचा लढा हुकूमशाही आणि जुमलेबाजीविरोधात आहे कारण.., इंडियाच्या बैठकीतून उद्धव ठाकरेंची गर्जना




मुंबई : 'इंडिया' आघाडीची तिसरी बैठक मुंबईत पार पडली. या बैठकीचं आयोजन ठाकरे गटाकडे देण्यात आलं होतं. उद्धव ठाकरे यांनी या बैठकीचं संपूर्ण आयोजन पाहिलं. इंडियाची बैठक पार पडल्यानंतर उद्धव ठाकरेंनी आपलं मनोगत मांडलं. त्यावेळी आमचा लढा हा जुमलेबाजीच्या विरोधात आहे असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. बैठक संपल्यानंतर मनोगताचा जो कार्यक्रम पार पडला त्या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन संजय राऊत यांनी केलं. तसंच आदित्य ठाकरे यांनी बैठकीत काय ठराव झाले ते वाचून दाखवले. तर त्यानंतर एक छोटेखानी भाषण करत उद्धव ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली.

इंडियाच्या तिसऱ्या बैठकीसाठी आलेल्या सगळ्या मातब्बर नेत्यांचं मी स्वागत करतो. आज तिसरी मिटिंग झाली. दिवसेंदिवस इंडियाची बळकटी वाढते आहे. आता सत्ताधारी घाबरले आहेत. आमची विरोधकांची एकजूट नाही तर आम्ही सगळे देशप्रेमी एकत्र आलो आहोत. इंडिया हे नाव आम्ही घेतलं आहे. आता देशावर प्रेम न करणारे कोण हे सगळ्यांना माहित आहे. हुकूमशाहीच्या विरोधात, मनमानीच्या विरोधात आणि मित्र परिवारवादाच्या विरोधातही आम्ही लढणार आहोत. कारण सबका साथ सबका विकास हा । पान २ वर

## शिक्षक पुरस्कारासाठी वशिल्याचे घोडे पुढे, खऱ्यांना न्याय केंव्हा मिळणार?

**अक्कलकोट गटशिक्षण अधिकाऱ्यांना या संदर्भातील माहिती विचारली असता,आमच्या कार्यालयकडे तीन प्रस्ताव दाखल असल्याचे सांगण्यात आले.तर आवक जावक रजिस्टरला एकच अर्ज असल्याचे समजते. नेमकं खरं कोणाचं? या मागचे गूढ काय, नेमकं खोट कोण कशासाठी बोलत आहे यांची चौकशी शिक्षणाधिकारी करतील काय**

अक्कलकोट/विशेष प्रतिनीधी : राज्य सरकारकडून पाच सप्टेंबर रोजी उत्कृष्ट शिक्षकांना पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.त्या अनुषंगाने जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून ही प्रक्रिया राबविली जात असुन विद्यार्थ्यांना घडवितांना सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या शिक्षकांकडून अर्ज मागविले आहे. माझ्याच ओळखीच्या शिक्षकांना पुरस्कार मिळावा म्हणून काही व्यक्तीकडून जोरदार प्रयत्न होत आहे. खऱ्या शिक्षकांना डावलून खोट्यांच्या फायली फायनल केली? जाणार असल्याचे शिक्षकांच्या चर्चेतून ऐकू येते.यामुळे शिक्षक पुरस्कारासाठी वशिल्याचे? घोडे पुढे, असल्याचे बोलले जाते.वरिष्ठांनी याची दखल घ्यावी अशी शिक्षक वर्गातुन मागणी होत आहे

आजवर केलेले काम,त्यासंदर्भात घेतलेली दखल,विविध संस्था आणि संघटनांकडून मिळालेले पुरस्कार यांची फायली तयार करुन अक्कलकोट पंचायत समिती येथे १४ऑगस्टपर्यंत प्रस्ताव सादर करण्यचे निर्देश जि.प.शिक्षण विभागाकडून देण्यात आले होते.त्या अनुषंगाने अंतिम मुदतीस,शासकीय वेळेनुसार १४ तारखेला एकच प्रस्ताव दाखल असल्याचा लिपिक पाटील हे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले तसा अवाक जा रजिस्टर मध्ये नोंद असल्याचे सांगितले

परंतु संबंधित गट शिक्षण अधिकाऱ्यांना विचारले असता,तीन प्रस्ताव दाखल असल्याचे सांगितले. प्रस्ताव तपासणीचे निर्देश १८ऑगस्ट असतांना तपास अधिकाऱ्यानी १८ ऐवजी २३ तारखेला तपासणी केली.दरम्यान शिक्षक विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख यांच्या पथकासह प्रस्ताव तपासणी प्रत्यक्ष शाळेवर जाऊन करण्याचे निर्देश असताना, त्या ठिकाणच्या भेट रजिस्टरला काहीही नोंद नसल्याचे दिसून येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी स्वतः तपासणी करून प्रस्ताव ताब्यात घेऊन मार्गस्थ झाल्याचे कळते .दाखल केलेल्या प्रस्तावाची विचारणा केली असता प्रशासनाकडून आकडेवारीची विसंगती माहिती दिसून येत आहे. समाधानकारक उत्तर न देता टाळाटाळ केली जात आहे.संबंधित वरिष्ठाने या प्रकरणात जातीने लक्ष घालून योग्य व निरपेक्ष निवड करावी, अशी शिक्षक वर्गातून मागणी होत आहे.बहुतांश अर्जांचा राजकीयदृष्ट्या विचार केला जाईल यामूळे खऱ्याखुऱ्या आदर्श शिक्षकांवर अन्याय होईल.या पद्धतीऐवजी प्रशासनाने त्यांच्याकडे असलेल्या खऱ्याखुऱ्या माहितीच्या आधारे जर शिक्षकांची निवड केली तर ती अधिक पारदर्शक ठरेल असे जाणकार व्यक्तीकडून मत व्यक्त केले जात आहे.वशिल्याच्या घोड्यांना पुढे न आणता योग्य काम करणाऱ्या शिक्षकांना न्याय मिळेल.तालुक्यामध्ये याविषयी दबक्या आवाजामध्ये कुजबूज चालू असून सदरील प्रक्रियेवर संशयाचा सावट आहे.

शिक्षक पुरस्कार २०२३ ची प्रक्रिया ही पूर्णपणे गंभीर व लाजिरवाणी आहेत.कारण१४ तारखेला प्रस्ताव देणे बंधनकारक होते.७ ते १४ तारखेस एकमेव प्रस्ताव प्राप्त झाल्याने पुन्हा अधिकाऱ्यांवर पत्रक काढून सांगण्याची वेळ येते,म्हणजेच याचा अर्थ आपल्या तालुक्यात गुणवत्ता पात्र शिक्षक नाही ती का?मग जर तसे शिक्षकच उत्साहीत नाही.तर आपण स्पर्धेचे भास दाखवून काय सिद्ध करू पाहताय,शिक्षण खातं, शिक्षण व्यवस्था पूर्ण ढासाळलेली आहे.उगीच पावडर लावून आव आणण्याचा प्रयत्न करू नये.

**-जयभाऊ पारखे, सामाजिक कार्यकर्ता अक्कलकोट**

## ✻ सुविचार ✻

समोर अंधार दिसत असला तरीही त्यापलीकडे उजेड आहे हे लक्षात ठेवा.

# संपादकीय

## आता सुर्याची भेट...

चंद्रयान ३ च्या यशानंतर आज २ सप्टेंबर रोजी सकाळी ११.५० वाजता इस्रोची 'आदित्य एल-१' ही मोहीम सूर्याचा अभ्यास करण्यासाठी सुरू होईल. चंद्रानंतर सूर्याचा अभ्यास करण्यासाठी तातडीने मोहीम सुरू करण्याचे धारिष्ट्य दाखवत इस्रोने जगाला या माध्यमातून एक वेगळा संदेश दिला आहे. कारण, चंद्राच्या दक्षिण धुव्रावर आतापर्यंत कोणत्याही देशाच्या अंतराळ संशोधन संस्थेची मोहीम यशस्वी झाली नव्हती; परंतु, याठिकाणी आपले यान यशस्वीपणे उतरवल्यानंतर इस्रोने वेगळा ठसा उमटवला. 'चांद्रयान-३'ने इतर अंतराळ संस्थांच्या तुलनेत जे यश मिळविण्याचे वेगळेपण इस्रोने जगापुढे निर्माण केले आहे, त्यात सातत्य राखण्यास 'आदित्य एल-१' मोहिमेमुळे मदत मिळणार आहे. मिशन चांद्रयान-३ नंतर 'आदित्य एल-१' ही मोहीम यशस्वी ठरल्यानंतर इस्रो यशाचे नवे शिखर गाठणार आहे. इस्रोच्या 'आदित्य एल-१' या मोहिमेकडून संपूर्ण जगाला आशा आहेत. कारण 'आदित्य एल-१' ही मोहीम केवळ भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी फायदेशीर ठरणार आहे. सूर्याच्या अभ्यासासाठीच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या मोहिमेद्वारे इस्रो मुख्यतः अंतराळातील सौरवादळे, तेथील तापमानवाढ आदी बाबींवर प्रामुख्याने प्रकाश टाकणार आहे. अंतराळातील घडणाऱ्या या बाबींचा परिणाम पृथ्वीवर कशाप्रकारे होणार असून यामुळे जीवसृष्टीला आगामी काळात कोणत्या संकटांचा सामना करावा लागणार आहे, या गोष्टींचा अभ्यास करणार आहे. भविष्यात सौरवादळांमुळे कधीतरी सूर्याचे तापमान वाढून त्याचा परिणाम पृथ्वीवर पडू लागला, तर त्यावर नियंत्रण ठेवणे आपल्या हातात राहणार नाही, मात्र 'आदित्य एल-१' सारख्या मोहिमांमध्ये होणाऱ्या अभ्यासातून वादळांची पूर्वसूचना पृथ्वीवासियांना मिळेल. शनिवारी सकाळी ११.५० मिनिटांनी इस्रो जेव्हा 'आदित्य एल१' सूर्याच्या दिशेने सोडेल, तेव्हा संपूर्ण जगाची नजर याकडे असेल. सूर्याच्या संस्कृतमधील शेकडो नावांपैकी एक, आदित्य हे नाव या मोहिमेला इस्रोकडून देण्यात आले आहे. 'आदित्य' हे अंतराळयान एल-१ या बिंदूवरून सूर्याचा अभ्यास करणार असल्याने मोहिमेचे नाव 'आदित्य एल-१' असे ठेवण्यात आले आहे. सौर अभ्यासासाठी आदित्य एल-१ ला पृथ्वीपासून सूर्याच्या दिशेने सुमारे १५ लाख किलोमीटर अंतरापर्यंतचा प्रवास करावा लागणार आहे.

पान १ वरुन

## एक देश एक निवडणुकीसाठी

कोणताही अजेंडा नसल्याचेही जोशी म्हणाले. त्यांनी माहितीसोबत जुन्या संसद भवनाचा फोटोही शेअर केला आहे. हे अधिवेशन जुन्या संसद भवनापासून सुरू होऊन नव्या सभागृहात संपेल, असे मानले जात आहे.

वर्षभरात संसदेची ३ अधिवेशने होतात. अर्थसंकल्प, पावसाळी आणि हिवाळी अधिवेशन. पावसाळी अधिवेशन २० जुलै ते ११ ऑगस्टपर्यंत चालले. पावसाळी अधिवेशनाच्या तीन आठवड्यांनंतर विशेष अधिवेशन बोलवण्याची घोषणा करण्यात आली आहे. पावसाळी अधिवेशनानंतर ३७ दिवसांनी विशेष अधिवेशन होणार आहे. हिवाळी अधिवेशन नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात सुरू करण्याचा प्रस्ताव आहे.

## व्यावसायिक सिलेंडरच्या ..

राखी पौर्णिमेच्या एक दिवस आधीच मोठं गिफ्ट दिलं. मोदी सरकारनं घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतींमध्ये २०० रुपयांची कपात केली आहे. तसेच, उज्वला गॅस योजनेअंतर्गत ७५ लाख भगिनींना मोफत गॅस कनेक्शन मिळणार आहे. त्यासाठी त्यांना एक रुपयाही द्यावा लागणार नाही. पाईप, स्टोव्ह आणि सिलेंडरही मोफत मिळेल. जगभरात गॅसच्या किमती वाढल्या आहेत, मात्र भारतात त्याचा परिणाम कमी आहे, असंही घोषणा करताना केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर म्हणाले. जुलैपूर्वी, व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमती यावर्षी मे आणि जूनमध्ये सलग दोनदा कमी करण्यात आल्या होत्या. मे महिन्यात तेल कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी सिलेंडरची किंमत १७२ रुपयांनी कमी केली होती. जूनमध्ये ८३ रुपयांची घट करण्यात आली होती. याशिवाय या वर्षी एप्रिलमध्येही त्यांच्या किमती ९१.५० रुपये प्रति युनिटनं कमी करण्यात आल्या होत्या. पेट्रोलियम आणि तेल कंपन्यांनी याचवर्षी १ मार्च रोजी व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमती ३५०.५० रुपयांनी कमी केल्या होत्या. यासोबतच एलपीजी सिलेंडरच्या दरांत प्रति युनिट ५० रुपयांनी वाढ करण्यात आली आहे.

## इंडिया आघाडीचं ठरलं!..

४०० लोकसभा मतदार संघात एकास एक लढत देण्याची रणनिती इंडिया आघाडीत चर्चा झाल्याचं सांगण्यात येत आहे. या व्यतिरिक्त जागा वाटपाची चर्चा लवकरात लवकर सुरू करण्यात येणार असून जिंकण्यासाठी त्याग करण्याची तयारी दाखवण्यात आली आहे. मात्र त्याचवेळी लोगोवर एकमत झालं नसल्याचं समोर आलं आहे. आता तयार केलेल्या लोगोमध्ये काँग्रेसचा हात आणि भारत जोडोचा प्रभाव जाणवत असल्याचा आक्षेप कम्युनिस्ट पार्टीने घेतल्याचं सांगण्यात येत आहे.

## जालन्यात मराठा आंदोलकांवर

जालन्याच्या घटनेवरून राजकारण करणं अशोभनीय आहे अशी प्रतिक्रिया देखील गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. या घटनेची चौकशी केली जाईल असंही त्यांनी सांगितलंय.

हवेत गोळीबार करुन आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न केला गेल्याचा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवारांनी केला आहे. लाठीचार्ज करणा-या पोलीस अधिका-यांची चौकशी करण्याची मागणीही वडेट्टीवारांनी केली. तसंच लाठीचार्ज करणारं निर्दयी सरकार असल्याचीही टीकाही वडेट्टीवारांनी केली.

जालन्यातील घटना अत्यंत निषेधार्ह आहे. गृहमंत्र्यांच्या सूचनेनुसार लाठीचार्ज झाला का? याची चौकशी व्हायला हवी असं सांगत एकनाथ खडसेंनी आपला रोख थेट देवेंद्र फडणवीसांकडे वळलाय.

मराठा आरक्षणाबद्दल राज्य सरकारनं काय पावलं उचलली, असा सवाल मराठा आरक्षण समन्वयक विनोद पाटील यांनी केलाय. लाठ्याकाठ्यांची भाषा बंद करावी, असंही त्यांनी म्हटलंय.

## आमचा लढा हुकूमशाही आणि

नारा दिला जातो पण विकास फक्त मित्रांचा केला जातो असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

निवडणुकीच्या वेळी नारा दिला जातो सबका साथ हा विकास हा नारा दिला जातो. निवडणूक जिंकल्यावर नारा असतो मित्रोंका साथ और सबको लाथ असं म्हणत उद्धव ठाकरेंनी मोदींवर टीका केली आहे. गॅस सिलिंडरच्या किंमती कमी केल्या म्हणत आहेत. मात्र २०१४ पासून या किंमती पहिल्यांदा हे दर कमी केले. हजार रुपये वाढवायचे आणि २०० रुपये कमी करायचे याला काय अर्थ आहे? पाच वर्षांत लूट आणि निवडणुकीच्या वेळी सूट हे काय कामाचं. गॅस सिलिंडर स्वस्त केला पण त्यावर शिजवणार काय? डाळ महाग आहे, भाज्या महाग आहेत त्याकडे कोण लक्ष देणार? लोकांना हे सगळं समजतं आहे असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

'जुडेगा भारत और जितेगा इंडिया' हा आमचा नारा आहे. आता आमचा लढा हुकुमशाहीच्या विरोधात आणि जुमलेबाजीच्या विरोधात आहे असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. तसंच लोकांचाही पाठिंबा आम्हाला मोठ्या प्रमाणावर मिळतो आहे. त्यामुळे विजय आमचाच होईल असाही विश्वास उद्धव ठाकरेंनी व्यक्त केला. कधीही घोषणा केली जाते, आज हे सुरु उद्या ते बंद. लोकांच्या मनात भय आहे. आता भयमुक्त भारतासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. लोकांनी मुळीच घाबरु नये असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

## सेंद्रीय पद्धतीने फुलवलेल्या आंबा फळबागेतून लाखोंचे उत्पन्न

### उद्धव बाबर यांचा प्रशंसनीय उपक्रम



पर्यावरण प्रेमी म्हणून परिचित असणारे शेतकरी उद्धव बाबर यांनी माण तालुक्याकील देवापूर येथे पडीक माळरानवर संपूर्णत: सेंद्रीय पद्धतीने आपली शेती फुलवली आहे. त्याच्या शेतातील केशर आंबा निर्यातीस आवश्यक सर्व निकषाची पात्रता सिद्ध करीत गेल्या दोन वर्षात श्री. बाबर यांनी आंबा परेदशात निर्यात केला आहे. यातून त्यांना भरघोस उत्पन्न मिळाले. याची दखल सातारा जिल्हा परिषदेने घेऊन कृषि विभागामार्फत देण्यात येणाऱ्या डॉ. जे.के. बसू सेंद्रीय व आधुनिक शेती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांची ही यशकथा.शेतकरी विविध पिकांसाठी शेतात रासायनिक खतांचा वारेमाफ वापर करीत असून रासायनिक खते व किटकनाशकांमुळे जमिनीचा पोत खराब होतो व खर्चही अधिक आहे या उलट जर शेतकऱ्यांनी सेंद्रीय खतांचा वापर केल्यास जमिनीचा पोत चांगला राहून शेती उत्पादनात सातत्य टिकून राहाते, याबरोबरच सेंद्रीय खताच्या वापरामुळे उत्पादित होणाऱ्या शेतमालाचा दर्जा वाढून परदेशात निर्यात करण्यासाठी निकषाची समस्या निर्माण होऊ शकत नाही याचा फायदा शेतीमालास जादा भाव मिळण्यास होते, असे श्री. बाबर आर्वजुन सांगतात.

उत्पादित शेती मालाला चांगला भाव मिळावा यासाठी श्री. बाबर यांनी प्रारंभी पासूनच सेंद्रीय शेती करण्याचा निर्णय घेतला. श्री. बाबार यांनी दीड एकरात दिडशे केशर, हापूस, गुलाल्या व रायवळ जातीच्या कलमी रोपांची लावगड केली. यामध्ये केशर आंब्याची १२० झाडे आहेत. ही झाडे १२ फुटाहून अधिक उंच वाढली आहेत. माण तालुक्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प असून पाणी टंचाई या समस्येवर मात करुन सर्व झाडांना ठिबक सिंचनाद्वारे पाणी देवून आंब्याची बाग फुलवली आहे.

सेंद्रीय शेतीसाठी त्यांना कृषि विभागाकडून विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने ठिबक सिंचन संच, गांडूळ खत प्रकल्प, कंपोस्ट खत प्रकल्प यासह इतर प्रकल्पांचा समावेश आहे. आंबा रोपाची लागवड केल्यापासून आज अखेर त्यांनी या फळबागेत रासायनिक खते व किटकनाशकाचा पूर्णत: वापर टाळून नैसिर्गत पद्धतीने बागेची जोपासना गेली दोन वर्ष करीत आहेत. गत वर्षातील फळ हंगामात निर्यातक्षम सर्व निकषाच्या चाचणीत केशर आंबा पात्र ठरल्याने दिडशे रुपये किलो दराने बोगतच व्यापाऱ्यांनी खरेदी केली. यंदाच्या हंगामात गत वर्षातील फळांपेक्षा अधिक क्षमतेने दर्जा वाढलेला निदर्शनास आल्याने यंदाही परदेशात विक्रीसाठी निर्यात करण्यास व्यापाऱ्यांनी बागेतच आंबा खरेदी करण्यास पसंती दिली.

नैसर्गित पद्धतीने आंबा बाग जोपण्याबाबत श्री. बाबार सांगतात, आंबा हे फळ झाड जंगली आहे. पूर्णत: नैसर्गिक पद्धतीनेच जर आंब्याची झाडे जोपासली फळधारणा त्यानंतर फळाचा आकार व वजन आणि विशेष बाब म्हणजे नैसर्गिक पद्धतीनेच पाड लागल्यानंतर तो पाला पाचोळ्यात आच्छादनात पिकविल्यानंतर फळाचा नैसर्गिक रंग व गोडवा व चवही वेगळीच अनुभवास आली आहे.

नैसर्गिक पद्धीने पिकवलेला आंबा लवकर नासत/सडत नाही. रासायनिक कार्बाईडचा वापर करुन जलद गतीने पिकविलेल्या आंब्याचा रंग एकसारखा गडद व आकर्षक असा जरी दिसत असला तरी तो आरोग्यासास हानिकारक असा आहे. हा आंबा लवकर सडतो हा त्यातील फरक आहे. मी व माझी पत्नी बागेची वर्षभर निगा व देखरेख करीत असतो. बागेतील प्रत्येक झाडांना वाळलेले गवत, झाडांचा पाला पाचोळा, कुजलेले शेण तलावातील गाळाची माती एकत्रित मिश्रण करुन प्रत्येक रोपाच्या बुंध्याभोवती गोलआकार पसरुन ठिबक सिंचनाचा वापर करुन पाणी देत आहोत.

बाग लागवडीपासूनच रासायनिक खताचा वापर श्री. बाबार यांनी टाळला आहे. तसेच झाडावर किटक नाशकाचा वापर केला नाही. झाडाच्या बुंध्या भोवती विविध कडधान्याबरोबरच देशी गायीच्या गोमुत्राची स्लरी जिवामृत वर्षातून तीन वेळा दिले. झाडांना मोहर फुलोरा आल्यानंतर परागीभवनासाठी मधमाशा व फुलपाखरांची यांची भूमिका खूप महत्त्वाची मानली जाते. रासायनिक खताबरोबर विषारी किटकनाशकाच्या वापराचा अतिरेक वाढल्यामुळे पर्यावरण संतुलनात बदल झाला परिणामी आज शेतमळ्यात शोधूनही फुलपाखरे दिसून येत नाहीत. तरीही उपलब्ध मधमाशीची गरज पाहता बागेलगत पडीक जमिनीत गोदन, कवट, काजू, तुती, आवळा, चिकू, बोर, पेरु, आवळा, हादगा, नारळ, गोड व आंबट चिंच, सरस, वाकोडा, सिताफळ, रामफळ, देशी केळी, जांभळ व डांबून, फॅशन फ्रुट, इत्यादी प्रकारची देशी विदेशी फळ-फुलांचीही लागवड केली यामुळे बागेत मधमाशांचा वावर वाढू लागला याचा फायदा आंबा बागेस होत आहे.

श्री. बाबार हे ऊसाचेही पीक सेंद्रीय पद्धतीने घेत आहेत. ऊसाचे गुऱ्हाळात गाळण करुन रासायनिक औषधे घटकांचा वापर टाळून पूर्णत: सेंद्रीय गुळ व काकवी उत्पादन करीत आहे. सेंद्रीय गुळाची व काकवीची बाजारपेठेत मागणी अधिक असल्याने अधिकच्या किंमतीमध्ये ही ग्राहक खरेदी करीत आहेत. मागणी जादा व पुरवठा कमी अशी स्थिती प्रत्येक वर्षी अनुभवास मिळत असून भविष्यकाळाची गरज ओळखून शेतकऱ्यांनी सेंद्रीय शेतीकडे वळावे, असेही आवाहन ते करतात.

विषमुक्त अन्न म्हणून सेंद्रीय उत्पादीत केलेल्या मालाकडे पाहिजे जाते. सेंद्रीय मालाला मुंबई, पुणे तसेच जिल्ह्यात मोठी मागणी आहे. मागणी प्रमाणे सेंद्रीय शेती उत्पादन पुरवठा खूप कमी आहे. तसेच सेंद्रीय पद्धतीने उत्पादीत केलेल्या मालाला चांगला दर ही बाजारपेठेत मिळत आहे. जिल्ह्यातील बऱ्याच शेतकऱ्यांनी सेंद्रीय शेतीतून आर्थिक उत्पन्न वाढविले आहे. शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त सेंद्रीय शेतीकडे वळून विषमुक्त शेती करावी याला सर्वोतपरी सहकार्य कृषि विभाग करेल.


**– हेमंतकुमार चव्हाण, माहिती अधिकारी, सातारा**

## सैनिक टाकळी मध्ये ९८/९९ दहावीतील त्याचे वर्गमित्र आपले रिटायर सैनिक मित्रांचा केला सत्कार




सैनिक टाकळी/ संजय चव्हाणः कोल्हापूर येथील सैन्य दलात भरती होऊन देशसेवा करण्याची अनेकांची स्वप्ने असतात. पण हे स्वप्न प्रत्येकाचंच पूर्ण होत नाही. सैनिक सीमेवर जीवाची बाजी लावून देशाचं संरक्षण करतात. पण हा सैनिक जेव्हा देशसेवा करुन पुन्हा एकदा घरी परतता तेव्हा प्रत्येकाचं ऊर अभिमानाने भरुन येतं. हवालदार वसंत पाटील हे १७ मराठ्याचे जवान सैन्या मधील आपली वीस वर्षाची देश सेवा करून एक सप्टेंबर २०२३ रोजी रिटायर झाले आहेत. त्यांच्या ९८-९९ च्या वर्ग मित्रांनी सत्कार समारंभ आयोजित केला होता. त्याच्यासोबतच त्यांच्या बॅचचे रिटायर झालेले हवालदार विजय पाटील, हवालदार दीपक पाटील व हवालदार जनार्दन पाटील यांची सुद्धा गावातून काढलेली मिरवणूक बऱ्याच दिवसातून टाकळी करांच्या भावना उत्तेजित करणारी होती. आपले सैनिक परंपरेचे गाव या गावातून बरेच सैनिक भरती होतात आणि रिटायर्ड पण होतात त्यांचा भरती होताना आणि रिटायर्ड होताना झालेला सत्कार हा त्याला त्याच्या पुढील जीवनासाठी चार माणसाचे बळ देत असतो. खरोखरच त्यांच्या ९८ ९९ च्या वर्ग मित्रांचे खास करून आभार मानतो तुम्ही आज ज्या रूपाने स्वागत समारंभ केला तो खरोखरच आम्हा सैनिकांना एक प्रेरणा देणार होता. सैनिक टाकळी चे शेकडो तरुण आज देशसेवेसाठी सैन्य दलात आहेत. कर्तव्य बजावत येथील १८ जवानांनी आजपर्यंत आपलं बलिदान दिलंय. मात्र २० वर्ष देशसेवा करून सुखरूप परतणाऱ्या जवानाचं अनोखं स्वागत करून सैनिक टाकळीच्या ९८-९९ च्या वर्ग मित्रांनी पायंडा पाडलेल्या प्रथेची चर्चा सर्व गावात रंगत आहे. पुढे पण आपले जवान भरती होतील किंवा रिटायर्ड होतील त्यांचा असाच प्रकारे सत्कार सर्व गावाच्या एकजुटीतून व्हावा हीच आम्ही सैनिक अपेक्षा असे रिटायर सैनिकांनी मनोगत व्यक्त केले.

## जया वर्मा सिन्हा यांची रेल्वे बोर्डाच्या अध्यक्षपदी नियुक्ती, १०५ वर्षाच्या इतिहासात प्रथमच महिला अध्यक्ष



नवी दिल्ली : केंद्र सरकारने जया वर्मा सिन्हा यांची रेल्वे बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. रेल्वे मंत्रालयाच्या १०५ वर्षांच्या इतिहासात हे पद भूषवणाऱ्या त्या पहिल्याच महिला ठरल्या आहेत. जया वर्मा सिन्हा या आज (१ सप्टेंबर २०२३) आपल्या नवीन पदाचा पदभार स्वीकारणार आहेत.

रेल्वे बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्षपदी गुरुवारी (३१ ऑगस्ट) जया वर्मा सिन्हा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जया वर्मा सिन्हा या अलाहाबाद विद्यापीठाच्या माजी विद्यार्थिनी आहेत. १९८८ मध्ये त्या भारतीय रेल्वे वाहतूक सेवेत रुजू झाल्या होत्या. आतापर्यंत त्यांनी तीन रेल्वे झोनमध्ये काम केलं आहे. यामध्ये उत्तर रेल्वे, दक्षिण पूर्व रेल्वे आणि पूर्व रेल्वेचा समावेश आहे. सध्या सिन्हा या रेल्वे बोर्ड सदस्य (संचालन आणि व्यवसाय विकास ) या पदावर कार्यरत होत्या. त्यांनी रेल्वेत ३५ वर्षाहून अधिक काळ रेल्वेत सेवा बजावली आहे.

अनिल कुमार लाहोटी हे जया वर्मा सिन्हा यांच्याआधी रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष होते. त्यांच्या जागी आता सिन्हा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सिन्हा आज पदभार स्वीकारणार आहेत. त्यांचा कार्यकाळ हा ३१ ऑगस्ट २०२४ रोजी संपणार आहे. विशेष म्हणजे सिन्हा १ ऑक्टोबरला निवृत्त होणार आहेत. त्यांच्या उर्वरित कार्यकाळासाठी त्यांची पुन्हा नियुक्ती केली जाणार आहे. ओडिशाच्या बालासोर जिल्ह्यात झालेल्या कोरोमंडळ एक्सप्रेस दुर्घटनेच्या वेळी जया वर्मा सिन्हा चर्चेत आल्या होत्या. त्यांच्या नेतृत्वाखाली हे संवेदनशील प्रकरण हाताळण्यात आले होते. त्यांनी या प्रकरणाचे पीएमओ कार्यालयाला पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन सादर केले होते. या अपघातत ३०० जणांचा मृत्यू झाला होता.

## आदित्य एल१ च्या लॉन्चिंगचं काऊंटडाऊन सुरू

नवी दिल्ली : भारताच्या पहिल्या सौर मिशन आदित्य L1 चं काउंटडाऊन सुरू झालं आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं शुक्रवारी (१ सप्टेंबर) यासंदर्भात ही माहिती दिली आहे. यापूर्वी, ISRO च्या शास्त्रज्ञांची एक टीम आदित्य-L1 मिशनच्या मिनी मॉडेलसह तिरुमला श्री वेंकटेश्वर मंदिरात प्रार्थना करण्यासाठी पोहोचली.भारताचं पहिलं सौर मिशन Aditya-L1 हे २ सप्टेंबर रोजी सकाळी ११५० वाजता आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा स्पेस सेंटरमधून अवकाशात झेपावणार आहे. आदित्य एल-१ च्या लॉन्चिगची संपूर्ण तयारी पूर्ण झाली आहे. यासंदर्भात माहिती देताना इस्रो शास्त्रज्ञ एस सोमनाथ यांनी म्हटलं की, रॉकेट आणि सॅटेलाईट सज्ज आहे. आम्ही प्रेक्षपणासाठी पूर्ण अभ्यास केलेला आहे. आदित्यला Lagrangian पॉईंट L1 जवळ ठेवण्याची योजना आखण्यात आली आहे. म्हणूनच, या मिशनला आदित्य-L1 असं म्हटलं जात आहे. सोलर कोरोनाचे निरीक्षण करणं हाच इस्रोच्या या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# मरवडे पंचक्रोशीतील हजारो महिलांनी अभिजीत पाटील यांना भाऊराया म्हणत बांधल्या राख्या

## रोजगार निर्मितीच्या माध्यमातून महिलांनी स्वावलंबी व्हावे,आपला भाऊ म्हणून कायम सोबत असेन : अभिजीत पाटील



पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजित पाटील व मित्र परिवाराच्या वतीने मरवडे पंचायत समिती, गटातील कविता पवार, सविता जाधव, निकीता पवार, सुनिता राठोड, सारिका केंगार, अर्चना चव्हाण, मोहीनी केंगार, लक्ष्मी सुतार, सुनिता सोनवणे, यांच्यासह पंचक्रोशीतील अनेक महिलांनी कार्यक्रमाचे अयोजन केले होते. पंचक्रोशीतील सर्व महिलांच्या उपस्थित रक्षाबंधन सोहळा लतिफभाई मंगल कार्यालय, मरवडे येथे श्री विठ्ठल सह.साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांना हजारो महिलांनी राखी बांधल्या आहेत..

कार्यक्रमाच्या प्रसंगी महिलांनी, शालेय विद्यार्थ्यांनी, वयोवृध्द मतांनी अभिजित पाटील यांना राखी बांधून ओवाळणी केली. वयोवृध्द मातांनी आबांना भरभरून शुभेच्छा आर्शीवाद दिले.

या रक्षाबंधन सोहळयात मरवडे पंचायत समिती गणातील सर्व गावातून महिलांनी हजारोंच्या संख्येने हजेरी लावली होती. चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वतीने महिलांना भाऊरायांची साडी वाटप करण्यात आली.

यावेळी हजारो बहिणींचा बंधूराज म्हणून अभिजीत आबा पाटील म्हणाले की, महिलांनी आता उद्योजक व्हावे, यामध्ये शासनाकडूनही अनेक सुविधा उपलब्ध करून देऊ. रोजगार निर्मिती होण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून अनेक गट निर्माण करावे, आगरबत्ती सारखा व्यवसाय आपण करू शकता. तसेच शिलाई मशिनची आवड असणार्या महिलांसाठी श्री विठ्ठल कारखान्याच्या गारमेंटच्या वतीने सहकार्य करून ऑर्डर देऊन महिला सक्षमीकरण आणि सबलीकरण नक्कीच होईल.

रक्षाबंधनानिमित्त आपण संकल्प करूया, कुटूंबाला आधार देण्यासाठी, शेती,दुध व्यवसायाला जोड व्यवसाय म्हणून स्वतः उद्योजक होण्यासाठी पुढे या, आपला भाऊ या नात्याने येणार्या कोणत्याही अडचणीच्या काळात साथ देण्यासाठी कटीबध्द असेल असे बोलताना सांगितले. यावेळी भाळवणी, डिकसळ, बालाजीनगर, मरवडे, कागस्ट, कात्राळ, कर्जाळ, फटेवाडी, हिवरगाव, हाजापूर, हिवरगाव, खोमनाळ, तळसंगी, भालेवाडी, डोणज, येड्राव सिद्धकनेरी आदी पंचक्रोशीतील अनेक महिलांभगिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या..

## फकिरा दल सामाजिक संघटनेच्या वतीने डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा संपन्न



अक्कलकोट/प्रतिनिधीः लीड इंटरनॅशनल स्कूल अक्कलकोट येथे फकिरा दल सामाजिक संघटनेच्या वतीने सत्यशोधक डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली.तत्पूर्वी डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धोत सहभाग नोंदवणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांचे पुष्पबुके देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी ज्येष्ठ समाजसेवी मातंग समाज अध्यक्ष निवृत्तीजी पारखे,लीड स्कूल प्राचार्य इ.जी.दीक्षित, फकीरा दल सोलापूर जिल्हा प्रमुख जयभाऊ पारखे, डॉ.अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती समिती अध्यक्षा ताराबाई शिरसागर, ॲ.नवनाथ धस,फकीरा दल शहर उप प्रमुख हर्षवर्धन देडे,स्कूल व्यवस्थापक संजय आळगी,मंजुळा वाघमारे,रत्ना भोसले,सलमा शेख,पूजा घाडगे,विजयालक्ष्मीकोरशेट्टी,दत्ता पोतदार, सुरज धूमशेट्टी,आदी शिक्षक वृंद विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंढरपूर येथे ३ सप्टेंबर रोजी अखिल भारतीय क्षत्रिय नामदेव महासंघ दिल्ली यांच्या बैठकीचे आयोजन

पंढरपूर/प्रतिनिधी : अखिल भारतीय नामदेव क्षत्रिय महासंघ नवी दिल्ली ची बैठक पंढरपूर येथे रविवारी ३ सप्टेंबर २०२३ रोजी अखिल भारतीय क्षत्रिय नामदेव महासंघ दिल्ली,संलग्न महाराष्ट्र राज्य शाखेची एक दिवसीय महत्वपूर्ण बैठक योगा भवन एलआयसी ऑफिस मागे येथे सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला संत शिरोमणी नामदेव महाराज यांचे १६ वंशज ह.भ.प.मुकुंद महाराज व ह.भ.प.माधव महाराज हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. नानासाहेब पाथरकर प्रदेश अध्यक्ष महेशजी ढवळे,टोणीजी,राजपालजी, ज्वालाप्रसादजी,श्रीमती रेखाताई वर्मा,महादेव खटावकर यांच्या उपस्थितीत बैठक होणार आहे.



या बैठकीला देशातील १३ राज्यातील व महाराष्ट्रातील पदाधिकारी व कार्यकर्त्य उपस्थित राहणार असून या बैठकीत शिंपी समाजातील सामाजिक,राजकिय सांस्कृतिक,शैक्षणिक,तसेच विविध विषयांवर सखोल चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहेत सदर बैठकीसाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे.यासाठी राज्य प्रदेश संघटक मनोज भांडारकर, प्रदेश प्रसिद्धीप्रमुख संतोष मुळे,पंढरपूर समाज अध्यक्ष गणेश उंडाळे, आनंद बंगाळे,दिनकर पंतगे, दिलीप बंगाळे,प्रशांत माळवदे, अनिल जांवजळ, ज्ञानेश्वर वडे हे अथक परिश्रम घेत आहेत.

## पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीच्या अध्यक्षपदी हरिष पाटणे यांची बिनविरोध निवड

पुणे : प्रसारमाध्यमांतील पात्र व्यक्तींना अधिस्वीकृती पत्रिका देण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीच्या अध्यक्षपदी हरिष पाटणे यांची निवड करण्यात आली.विभागीय माहिती कार्यालय पुणे येथे माहिती उपसंचालक डॉ. पुरुषोत्तम पाटोदकर यांच्या उपस्थितीत अध्यक्ष निवडीसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीस समितीचे सदस्य गोरख तावरे, अमन सय्यद, चंद्रसेन जाधव, सुनित भावे, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. किरण मोघे उपस्थित होते. प्रसारमाध्यमांशी संबंधित व्यक्तींना अधिस्वीकृती देण्यासंबंधी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती नियम २००७ नुसार ही समिती गठित करण्यात आली आहे. श्री. पाटणे हे सातारा येथे दै. पुढारीचे आवृत्ती प्रमुख म्हणून कामकाज पाहतात.

प्रारंभी उपसंचालक (माहिती) डॉ. पाटोदकर यांनी उपस्थित समिती सदस्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. श्री. पाटणे यांची अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर समिती सदस्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.



## केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी हरेगाव मधील पिडीत मुलांची घेतली भेट



मुंबई/विशेष प्रतिनिधी : श्रीरामपुर तालुक्यातील हरेगाव मध्ये कबुतरे चोरल्याच्या संशयावरुन दलित मुलांना झाडाला उलटे टांगून अमानुष मारहाण करण्यात आली.हा अत्यंत निर्घृण आणि माणूसकिला काळीमा फासणारा प्रकार आहे. या प्रकरणाची दखल घेऊन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रिय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना.रामदास आठवले यांनी आज(दि.१)रोजी दुपारी श्रीरामपुर मधील साखरकामगार रुग्णालयात जाऊन तेथे उपचार घेत असलेल्या हरेगाव मधील पिडीत मुलांची भेट घेतली.त्यांचे सांत्वान करुन त्यांना धिर दिला. त्यानंतर ना.रामदास आठवले यांनी हरेगाव ला भेट दिली.

हरेगाव मधील पिडीत मुलांच्या कुटुंबियांची हि ना.रामदास आठवले यांनी भेट घेतली.या पीडीत मुलांन मध्ये एक मुलगा मराठा समाजाचा आहे. गावगुंडांच्या त्रासाला सर्वच जाती धर्माच्या लोकांना बळी पडावे लागत आहे. झालेल्या प्रकाराचा रिपब्लिकन पक्षा तर्फे तिव्र निषेध करण्यात आला असून या प्रकरणी रिपब्लिकन पक्षाने सुरुवाती पासून पिडीत मुलांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.या प्रकरणातील तीन आरोपींना अटक करण्यात आली असून प्रमूख आरोपी नाना गलांडे हा फरार आहे.

या आरेपीला त्वारित अटक करुन कठोरात कठोर शिक्षा करावी अशी तिव्र भावना पिडीत मुलांच्या कुटुंबियांनी ना.रामदास आठवले यांच्या कडे व्यक्त केली.

हरेगाव प्रकरणातील आरोपींवर मोक्का कायद्यानुसार कारवाई करुन खटला जलद गती न्यायालयात चालवून सर्व आरोपींना कठोरात कठोर शिक्षा करण्यात यावी तसेच फिर्यादीला पोलीस संरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांची आपण भेट घेणार आहोत तसेच या प्रकरणातील पिडीत मुलांना मुख्यमंत्री सहायता निधीतुन प्रत्येकी किमान एक लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी.यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आपण भेट घेणार असे ना.रामदास आठवले या वेळी म्हणाले.या प्रकरणात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तातडीने गावाला भेट देऊन योग्य कारवाई केली. असे ना.रामदास आठवले यावेळी म्हणाले.

रिपब्लिकन पक्षा तर्फे पिडीत मुलांना प्रत्येकी दहा हजारांची अर्थिक मदत करण्यात आली.पिडीत मुलांच्या कुटुंबाच्या पाठीशी रिपब्लिकन पक्ष खंबीर उभा आहे. अशी ग्वाही ना.रामदास आठवले यांनी या वेळी दिली.

या प्रसंगी रिपाइं चे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात,रिपाइं चे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रकाश लोंढे,संपर्क प्रमुख श्रीकांत भालेराव,विजय वाकचोरे,राजा कापसे,बाळासाहेब गायकवाड,भिमा बागूल,सुनिल साळवे,पप्पू बनसोडे,रमाताई धिवर,मनालीताई जाधव आदि अन्य मान्यवर उपस्थित होते.

## टाकळीवाडी येथे प्रत्येक पौर्णिमेला बौद्ध वंदना हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न



टाकळीवाडी/नामदेव निर्मळे : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे बौद्ध समाजाने ५ मे पासून बौद्ध विहार मध्ये बौद्ध वंदना कार्यक्रम प्रत्येक दर रविवारी व पौर्णिमेला आयोजित करण्यात येत आहे.बौद्ध समाजाने हा घेतलेला कार्यक्रमाचे गावामध्ये कौतुक होत आहे. बौद्ध विचार सर्वांच्या पर्यंत पोहोचावे. बुद्ध वंदना केली जाते. चांगले विचार समाजापर्यंत पोहोचवण्याचे काम चालू आहे.तसेच प्रत्येक पौर्णिमेला महाप्रसादाचे सुद्धा आयोजन केले जाते.सुलाबाई राजाराम कांबळे वय ८५ यांनी या वयात सुद्धा बौद्ध शिकवण आत्मसात केलेली आहे. यावेळी बौद्ध उपवासक, उपवासिका मोठ्या संख्येने उपस्थित असतात. बौद्ध विचार आचरणात आणण्याचे काम चालू आहे. महाप्रसादाचे मानकरी विलास राजाराम बळी, सुवर्णा दगडू कांबळे रा.भातनांगणुर, अक्काताई दिलीप कांबळे रा. हेरवाड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले होते. यावेळी समस्त बौद्ध समाज उपस्थितीत होता. बौद्ध समाजाचे कौतुक होत आहे.

## गोकुळ अष्टमी निमित्त मुरलीधर मंदीरात कीर्तन महोत्सव

### कीर्तन महोत्सवात गोंदीच्या मुळे महाराजांचे निरूपण

अक्कलकोट/प्रतिनिधीः येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलित मृदूलाराजे मुरलीधर मंदीरात गोकुळाष्टमी निमित्त सालाबादाप्रमाणे जन्माष्टमी कीर्तन महोत्सवाचे व अखंड नामवीणा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या कीर्तन महोत्सवात जालना जिल्ह्यातील श्रीक्षेत्र गोंदीचे ह.भ.प. श्रीपाद महाराज मुळे हे कीर्तन सेवेत निरूपण करतील अशी माहिती मंदिर समितीचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली. दिनांक ३१ ऑगस्ट ते दिनांक ६ सप्टेंबर अखेर रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत श्रीकृष्ण जन्माष्टमीचे किर्तन महोत्सव व दिनांक ७ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत गोपाळकाल्याचे कीर्तन संपन्न होईल. दुपारी १२ वाजता अनेक भाविकांच्या उपस्थितीत व मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीपाद महाराज मुळे यांच्या हस्ते दहीहंडी फोडून गोकुळ अष्टमी महोत्सवाची सांगता होईल. यानंतर दुपारी १२ ते ३ या वेळेत सर्व भाविकांना देवस्थानच्या वतीने भोजन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. आज गोकुळाष्टमी निमित्त आयोजित अखंड नामवीणा सप्ताहाचे शुभारंभ मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी सर्व भाविकांनी श्रींच्या दर्शनाचा, कीर्तन महोत्सवाचा, नामवीणा सप्ताहाचा, दहीहंडी सोहळ्याचा व भोजन महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन देवस्थानचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी सर्व भाविकांना केले आहे.





## मैंदर्गी येथे पिण्याचे पाणी चे सोय करण्यात यावे : मालनबी शेख

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील काही वार्डात पाण्याचे तिव्र टंचाई होत आहे. तरी लवकरात लवकर पाण्याचे सोय करण्यात यावे अशी मागणी मानवाधिकार न्याय सुरक्षा संघटनेचे जिल्हा महिला अध्यक्षा मालनबी शेख यांनी मुख्याधिकार्याकडे केली आहे.

मैंदर्गी येयेथील एक आणी तिन या वार्डात पाण्याच्या तिव्र टंचाई आहे तरी या वार्डातील रुद्रप्पा यंकंची व रामा तेली यांच्या घरा शेजारी प्रत्येकी एक एक सिंटेक्स बसवून पाण्याची सोय करण्यात यावी.

अशी मागणीचे निवेदन मुख्याधिकारी आतील वाळुंज यांना केली आहे. या मागणीचे निवेदन मानवाधिकार न्याय सुरक्षा संघटन भारत चे जिल्हा महिला अध्यक्ष मालनबी शेख, तालुका अध्यक्ष मक्तूम लुकडे यांनी नगर परिषदेचे प्रकाश मनिकडे यांच्याकडे सुपूर्द केली आहे.

याप्रसंगी निवेदन देतांना राजश्री इंटगर, कस्तूरबाई जेटगी,फुलाबाई गाडीवडर,राधिका इटगर आणी संगीता गाडीवडर आदि उपस्थित होते. या निवेदनाचे दखल घेऊन लवकरात लवकर पाण्याचे सोय करण्यात यावे अन्यथा मानवाधिकार न्याय सुरक्षा संघटनेच्या वतीने आंदोल छेडण्याच इशारा मालनबी शेख व मक्तम लुकडे यांनी केली आहे.

